# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न: सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया आणि
महाराष्ट्र ऑलम्पिक असोसएशन

ईशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगांव, अहमदनगर ४१४ ००१
ई मेल: cyclingassociationmaharashtra@gmail.com मो. ७३८ ५०८ १२७०


# जाहिर विनम्र आवाहान

दिनांक: ३० मार्च '२०

प्रती,

मा. अध्यक्ष / मा. सचिव
सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला संलग्न सर्व जिल्हा संघटना, क्लब, सर्व सायकलपट्टू व त्यांचे पालक आणि प्रशिक्षक व इतर सर्व संबंधीतांस

सस्नेह नमस्कार

विषय: कोरोना विषाणूचा (कोविड-१९) सामना करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत करणेबाबत ....

महोदय / महोदया

सध्या महाराष्ट्रावर व आपल्या देशावर कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत आहे. याला रोखण्यासाठी महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार प्राधान्याने खूप चांगले काम करित आहे.

आपण सर्वचजण शासनकर्त्यांच्या, प्रशासनाच्या व पोलीसांच्या आवाहानास प्रतिसाद देत आपापल्या

घरात थांबून राहिलो आहोत, आजच्या घडीला या महाभयंकर महामारीला रोखण्याचा हाच एकमेव मार्ग व उपाय आहे. ही एकप्रकारे देशसेवाच असून त्यामुळे या महाभयंकर राक्षसास संपवणे आपल्याला शक्य होणार आहे.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष आदरणीय अजितदाद पवार आपल्या महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री आहेत. खेळ व खेळांडूंसाठी माननीय अजितदादांनी घेतलेले निर्णय व दिलेले योगदान महाराष्ट्राचे खेळाडू, संघटक कधीच विसरु शकणार नाहीत.

सर्व प्रशासनाचा विरोध असताना खेळाडूंसाठी शासकीय नोकरी मध्ये ५% आरक्षण केवळ मा. अजितदादांच्याच आग्रहामुळे शक्य झाले व आज सुपर क्लास वन पासून खेळाडूंना महाराष्ट्र शासनात थेट नोक-या मिळत आहेत व हजारो खेळाडू शासकीय नोकरीमध्ये कार्यरत आहेत.

याशिवाय खेळाडूंचे प्रशिक्षण, सराव, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील सहभाग, १०वी व १२वी च्या वर्गातील खेळाडूं विद्यार्थ्यांना २५ गुणांची सवलत व पुढील शिक्षणासाठी आरक्षण या व अनेक गोष्टींचे निर्णय व त्यांची अंमलबजाणी मा. दादांनी जातीने लक्ष घालून

प्राधान्याने करुन घेतली आहे. सद्यपरिस्थितीमध्ये मा. अजितदादांवर राज्याची खूप मोठी जबाबदारी आहे अशा वेळी आपण सर्वांनी त्यांना भक्कम साथ द्यायला हवी.

कोरोना विषाणूचा (कोविड - १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय उद्धवजी ठाकरेसाहेब, उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा, त्यांचे सर्व सहकारी, राज्याचे प्रशासन आणि पोलीस युद्ध पातळीवर प्रयत्न करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून आदरणीय ठाकरेसाहेब आणि आदरणीय अजितदादांनी मुखमंत्री सहाय्यता निधीस मदत करण्याचे जाहिर आवाहन केले आहे.

क्रीडाक्षेत्रामधील आपण सर्वांनी आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून कोरोना विषाणूच्या (कोविड - १९) या संकटसमयी आपल्या नेत्यांबरोबर खंबिरपणे उभे राहणे ही आजची गरज आहे.

यासाठी आपण सर्वांनी आपापल्या घरात थांबावे आणि या लढाईमधील आपापला खारीचा वाटा म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रोख मदत करावी असे आम्ही सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्च्यावतीने संलग्न सर्व जिल्हा सायकलिंग संघटना, सर्व सायकलपट्टू त्यांचे पालक व प्रशिक्षकांना जाहिर आवाहन करीत आहोत.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या वतीने या संकटसमयी खारीचा वाटा म्हणून असोसिएशनच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये रुपये १०,०००/- ची रक्कम आज रोजी जमा करण्यात आली असून आपणा सर्वांना जाहिर विनंती की आपण आपला मदत निधी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे पाठविल्यास तो सर्व एकत्रित करुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये वर्ग करण्यात येईल किंवा आपण आपला निधी स्वतंत्रपणे मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये आपला खारीचा वाटा म्हणून जमा करावा व त्याचा तपशील सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे पाठवावा.

Indian Olympic Association चे महासचिव मा. श्री. राजीव मेहता यांच्या आवाहानास प्रतिसाद देताना सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने रुपये ५,०००/- चा निधी Cycling Federation of India कडे वर्ग केला असून CFI रुपये १,००,०००/- चा निधी IOA च्या मार्फत मा. पंतप्रधान सहाय्यता निधीसाठी देणार आहे.

देश व राज्यापुढील संकटसमयी प्रत्येकजण आपापल्यापरिणे या संकटाचा सामना करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील सायकलिंग खेळाच्या कुटुंबाच्यावतीने आपण सर्व एकजुटीने आपल्या नेत्यांना खंबिरपणे साथ देऊयात.

आपणा सर्वांकडून नेहमीच सहकार्य मिळाले आहे, यावेळीही मिळेल ही अपेक्षा.

कळावे, धन्यवाद!!

आपले विनीत

| अॅड. विक्रम रोठे | प्रताप जाधव | प्रा. संजय साठे | भिकन अंबे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | मानद सचिव | खजिनदार |

सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य,
सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र


## बँक खात्याचा तपशिल पुढीलप्रमाणे:

1) a). A/c Name : **Cycling Association of Maharashtra**
b. Bank : Bank Of Maharashtra
c). Branch : Overseas Branch, F C Road, Shivajinagar, Pune 411005
d). A/c Type : Saving
e). A/c No. : **60307471103**
f). IFS Code : **MAHB0001144**


2) a). A/c Name : **Mukhyamantri Shayata Nidhi - Covid 19**
मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९
b. Bank : State Bank Of India,
b. Branch : Mumbai Main Branch, Fort, Mumbai 400 023
c). Branch Code : 00300
d). A/c No. : **39239591720**
e). IFS Code : **SBIN0000300**

अधिक माहितीसाठी कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा

प्रताप जाधव मो. ९४२ २३३ ६८०८
प्रा. संजय साठे मो. ७३८ ५०८ १२७०




**Mukhyamantri Sahayyata Nidhi-Covid 19**




**Cycling Federation of India**